ePaper
|वर्ष - 6 ।अंक - 230 | UDYAM-MH-26-0158827 |
# महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | ।रविवार।दिनांक 4 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## ‘मुख्यमंत्र्यांचे ठाणे’ बदलणार! पुढील 3 ते 6 महिन्यात शहराचे रुप पालटणार



आतील पानांत
- महाराष्ट्राच्या अस्मितेविरोधात बोलल्यास शांत बसणार नाही
- दिव्यागांसाठी कौशल्य विकास योजना !
- होय, आम्ही ‘उजवेच’ आहोत...

# विसरु नका या घडीला, येताय ना इंद्रायणी थडीला?

## महेश लांडगे यांचा आणखी एक ‘मेगा इव्हेंट’ : सोशल मीडियावर ‘कमिंग सून’ चे ब्रॅंडिंग






।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

“मेगा इव्हेंट”साठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आणखी एक “रेकॉर्ड ब्रेक” उपक्रम पिंपरी-चिंचवडकरांसह संपूर्ण महाराष्ट्राला पहायला मिळणार आहे.

“महिला सक्षमीकरण आणि सन्मान” या संकल्पनेतून आमदार लांडगे यांच्या सौभाग्यवती पूजा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली भव्य “इंद्रायणी थडी” जत्रेचे आयोजन करण्यात येते. कोविड महामारीतील दोन वर्षे इंद्रायणी थडी जत्रा घेता आली नाही. त्यामुळे यावर्षी मोठ्या दिमाखात ही जत्रा होणार आहे.

भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत, इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेले “रिव्हर सायक्लोथॉन” यानंतर आता इंद्रायणी थडी गर्दीचा उच्चांक मोडणार आहे. त्यासाठी “टीम-एमडी” कामाला लागली असून, सोशल मीडियावर इंद्रायणी थडीचा ‘टिझर’ नुकताच व्हायरल करण्यात आला आहे. इंद्रायणी थडी जत्रेत महिला बचत गटांसाठी सुमारे १००० हजार स्टॉल असतील. किमान १०० विविध प्रकारचे मनोरंजन आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम राहतील. जत्रेतील स्टॉलसाठी शहरातील महिला बचत गटांनी नाव नोंदणी करावी, असे आवाहनही आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### गर्दीचा उच्चांक गाठणारी जत्रा...

इंद्रायणी थडी जत्रा ही पुण्यातील भीम थडी जत्रेच्या धर्तीवर सुरू करण्यात आली. पहिल्या दोन-तीन वर्षांत पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातून शेकडो महिला बचत गटांनी या जत्रेत सहभाग घेतला. कोविड महामारीपूर्वी झालेल्या जत्रेत सुमारे ५ लाख नागरिकांनी भेट दिली होती. यावर्षी हा गर्दीचा उच्चांक आणखी वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे इंद्रायणी थडीत आमदार लांडगे आणि टीम कोणते रेकॉर्ड करणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### पिंपरी-चिंचवडकरांसाठी दोन जत्रांची पर्वणी...

दरम्यान, शहरातील महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तू व साहित्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने दरवर्षी पवनाथडी जत्रा आयोजित केली जाते. मात्र, कोरोना महामारीमुळे पावणेतीन वर्षे या जत्रेमध्ये खंड पडला होता. आता यावर्षी पुन्हा पिंपरी चिंचवड महापालिका पवनाथडी जत्रा भरविणार असून सांगवीतील पीडब्ल्यू मैदानावर येत्या 16 ते 20 डिसेंबर दरम्यान पाच दिवस ही जत्रा असणार आहे. त्यामुळे यावर्षी पवना थडी आणि इंद्रायणी थडी अशा दोन जत्रांचा आस्वाद पिंपरी-चिंचवडकरांना घेता येणार आहे.

# निकृष्ट आहार देणारी संस्था ‘काळ्या यादीत’

## आयुक्त शेखर सिंह यांचा दणका : इस्कॉन अन्नामृत फाउंडेशनला दिले काम

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा आहार पुरवठा करणाऱ्या सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेला आयुक्त शेखर सिंह यांनी दणका दिला आहे. या संस्थेचे काम काढून घेत काळ्या यादीत टाकले. हे काम इस्कॉनच्या अन्नामृत फाउंडेशनला देण्यात आले आहे.



महापालिका शाळेतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेला ६ ऑगस्ट २०२२ रोजी काम दिले होते. महापालिकेच्या १३ शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शालेय पोषणाचे काम या संस्थेला दिले होते. पण, या संस्थेकडून पुरवठा करण्यात असलेल्या खिचडीचा निकृष्ट दर्जा, सकस सुका खाऊ नियमित पुरवठा होत नसल्याबाबत आणि संस्थेकडून पुरवठा होत असलेल्या भातात काचेचा, प्लास्टिकचा तुकडा, आळ्या, केस सापडत असल्याबाबतच्या विविध शाळांच्या मुख्याध्यापकांनी तक्रारी केल्या. तसेच माजी नगरसेवकानेही तक्रार केली. या संस्थेने कारणे दाखवा नोटिशीलाही मुदतीत उत्तरे दिली नाहीत.

### विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रथम प्राधान्य...

संस्थेबाबत येणाऱ्या तक्रारी, असमाधानकारक खुलासा आणि निकृष्ट दर्जाचा, खाण्यास अयोग्य असलेला पुरवठा केला जात असलेला पोषण आहार यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास, आरोग्यास हानी पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. वारंवार लेखी, तोंडी स्वरूपात कळवूनही पोषण आहारामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा होत नसल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून, या संस्थेला दिलेले पोषण आहार पुरवठ्याचे कामकाज काढून घेण्यात आले. या संस्थेस भविष्यात आहार पुरवठ्याबाबत निविदा भरण्यास प्रतिबंध करत काळ्या यादीतही टाकण्यात आले.

# महाराष्ट्राच्या अस्मितेविरोधात बोलल्यास शांत बसणार नाही

## वढू बुद्रुक येथे आमदार रोहित पवारांसह पदाधिकाऱ्यांनी केले आत्मक्लेश आंदोलन

पुणे । महाईन्यूज ।

कोरेगाव भीमा - महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा सतत होत असलेला अवमान हा महाराष्ट्रातील शिवभक्तांसाठी अत्यंत वेदनादायी आहे. महाराष्ट्राची अस्मिता तसेच थोरपुरुषांच्या विरोधात अपप्रचार करुन शेकडो वर्षाच्या सामाजिक परंपरेला तडा देण्याचे काम काही व्यक्तींकडून होत आहे. मात्र आमचे आदर्श असलेल्या थोरव्यक्तीसह महाराष्ट्राच्या अस्मितेविरोधात कोणी बोलल्यास आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा देत आमदार रोहित पवार



व त्यांच्या समवेत आलेल्या राष्ट्रवादीचे आमदार व पदाधिकाऱ्यांनी आज श्रीक्षेत्र वढु बुद्रुक येथे मौन धरून आत्मक्लेष आंदोलन केले.

छत्रपती श्रीसंभाजी महाराज यांच्या समाधीस्थळी दर्शन घेऊन व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आत्मक्लेश आंदोलनास सुरुवात करण्यात आली. यावेळी आमदार रोहित पवार यांच्यासह शिरूर-हवेलीचे आमदार ॲड. अशोक पवार, आमदार अमोल मिटकरी, आमदार सुनिल टिंगरे, नितीन पवार, प्राजक्त तनपुरे, संदिप क्षिरसागर, अतुल बेनके, माजी आमदार ॲड. जयदेव गायकवाड, रुपाली ठोंबरे, कल्याण आखाडे, राजा जयपूरकर, अक्षय शिंदे, जुनेंद्र दुर्गाणी, राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षा भारती शेवाळे, शिरूर तालुकाध्यक्ष रविंद्र काळे, हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर, सरपंच सारिका शिवले, माजी सरपंच प्रफुल्ल शिवले, अंकुश शिवले, अनिल शिवले आदींसह मोठ्या संख्येने शिव-शंभू भक्तांसह पदाधिकाऱ्यांनी सुमारे दोन तास मौन धरुन आत्मक्लेष आंदोलन केले. यावेळी शाहिर राजेंद्र कांबळे यांनी शिव गीते व पोवाडेही सादर केले. आंदोलनाच्या शेवटी प्रतिज्ञा व राष्ट्रगीताने समारोप झाला. यावेळी अधिक बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले की, 'शंभूराजांनी शिवरायांचा आदर्श ठेवत मोठ्या शक्तिच्या विरोधात लढा दिला. त्यांना झुकविण्याचा, विचारावर घाला घालण्याचा प्रयत्न करुनही ते कोणापुढेही झुकले नाही, हाच संदेश घेत पुढची ताकद कितीही मोठी असली तरी त्या ताकदीच्या समोर विचारांच्या ताकदीवर झूकायचं नाही. असंही त्यांनी सांगितले. तर सर्व पक्ष व सामाजिक संघटनांसह नागरिकांना

## भटके-विमुक्त जाती-जमातींचे ११ डिसेंबरला राज्यस्तरीय अधिवेशन

पुणे । महाईन्यूज ।

राज्यातील भटके आणि विमुक्त जाती-जमातींचे अधिवेशन ११ डिसेंबर रोजी वानवडी येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाश शिंदे, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, **इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे या अधिवेशनास उपस्थित राहणार आहेत.**



भटक्या विमुक्त जाती जमाती सामाजिक आधार संघटनेचे अध्यक्ष हरि सावंत, जलसंपदा विभागाचे माजी कार्यकारी अभियंता व साजिर प्रतिष्ठानचे अध्यक्ष पांडुरंग शेलार यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे होत असताना भटके आणि विमुक्तांचे प्रश्न अद्याप प्रलंबितच आहेत. त्याकडे या अधिवेशनातून सरकारचे लक्ष वेधण्यात येणार आहे. भटके आणि विमुक्त जाती जमातीच्या नागरिकांना दाखले मिळण्यातील अडचणी दूर करण्यात याव्यात, सरकारी जमिनींवरील वसाहती नियमित कराव्यात, लघुउद्योजकांना कर्ज उपलब्ध करून द्यावे, बेरोजगारांना रोजगार द्यावा, वसंतराव नाईक महामंडळाला एक हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, समाजातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यावे, या मागण्या अधिवेशनात करण्यात येणार आहेत.

## निधी न देता शाळांमध्ये समता सप्ताह राबवण्याचे निर्देश

पुणे । महाईन्यूज ।

अपंग बालकांकडे समान संधी आणि मानवी अधिकाराच्या दृष्टिकोनातून पाहण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये ९ डिसेंबरपर्यंत समता सप्ताह राबवला जाणार आहे. मात्र त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नसून, लोकसहभागातून कार्यक्रम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अपंग विद्यार्थ्यांबरोबर भेदाभेद होऊ नये, पालकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ नये, सर्वसामान्यांप्रमाणे जीवनशैली जगण्याबाबतच्या प्रचार-प्रसारासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये समता सप्ताह राबवण्यात येणार आहे. विशेष गरजा असणारी मुले, पालकांशी संवाद, चर्चासत्र, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धात्मक कार्यक्रम, अपंग गुणवंत विद्यार्थ्यांच्या मुलाखती असे कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# पिंपरी-चिंचवड पालिका आयुक्त शेखर सिंह कल्पवृक्षासाठी मसिहा

## नारळाच्या वृक्षतोडीस आलेले साडेतीनशेहून अधिक अर्ज फेटाळले

पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी चिंचवड महापालिका वृक्ष प्राधिकरण समितीमार्फत वृक्षतोडीच्या प्रकरणांना मोठ्या प्रमाणात मंजुरी दिली जात असतानाच दुसरीकडे महापालिका आयुक्त शेखर सिंह किमान कल्पवृक्ष मानल्या जाणाऱ्या नारळाच्या झाडांसाठी मसिहा ठरले आहेत. गेल्या चार महिन्यांत त्यांनी वृक्ष प्राधिकरण समितीकडे नारळाच्या वृक्षतोडीस मान्यतेसाठी आलेले साडेतीनशेहून अधिक अर्ज फेटाळून लावले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पर्यावरणाचे महत्त्व जाणून आजवर 21 लाखांहून अधिक वृक्षारोपण केले आहे. 175 हून अधिक उद्याने विकसित**





**केली आहेत. सन 2007 मध्ये केलेल्या वृक्षगणनेत शहरात 18 लाख 93 हजार झाडे आढळली. त्यानंतर 2018 मध्ये वृक्षगणना सुरू झाली.**

त्याचे काम फेब्रुवारी 2022 मध्ये पूर्ण झाले. वृक्षगणनेत 32 लाख वृक्ष आढळून आले. मात्र, कधी रस्ता रुंदीकरणासाठी तर कधी सिमेंटची जंगले उभी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करावी लागत आहे. महापालिका वृक्ष प्राधिकरण समितीची सभा दर 45 दिवसांनी होते. शंभरपेक्षा अधिक वृक्षतोडीची प्रकरणे सभेपुढे मान्यतेसाठी असतात, त्यापैकी 70 ते 75 अर्जांना मंजुरी दिली जाते. त्यामुळे वृक्ष प्राधिकरण समिती ही वृक्षतोड समिती ठरली आहे.

महापालिकेची मुदत संपल्यानंतर प्रशासकीय राजवट आली. राजेश पाटील यांच्यानंतर महानगरपालिका आयुक्तपदी शेखर सिंह यांची नियुक्ती झाली. पर्यावरणप्रेमींच्या दृष्टीने आनंदाची गोष्ट म्हणजे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने एक चांगला निर्णय घेतला. नारळाच्या झाडांमुळे मोठे अपघात होत नाहीत. फार तर फक्त नारळाच्या झावळ्या व नारळ खाली पडतात.

अशा परिस्थितीत वृक्ष प्राधिकरण समितीकडे नारळाचे झाड तोडण्यासाठी अर्ज आला असता तो फेटाळून लावण्याबाबत आयुक्त सिंह यांनी आदेश दिले. गेल्या चार-पाच बैठकांपासून नारळाचे झाड तोडण्यासाठी आलेली साडेतीनशेहून अधिक प्रकरणे म्हणजेच तितके अर्ज आयुक्त सिंह यांनी फेटाळून लावले आहेत.

विनापरवाना वृक्षतोड करणाऱ्यांना जरब बसावी, यासाठी अशा प्रकरणात दोषी व्यक्तीला जागेवरच दंड करण्याचा नाशिक महापालिकेचा प्रस्ताव

> नारळाच्या झाडांमुळे अपघात होत नाहीत; मात्र त्याची फळे (नारळ) व झावळ्या पडतात अशी झाडे खासगी जागेत असतील, तर पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत झावळ्या व नारळ काढून दिले जातात. त्यासाठी प्रतिवृक्ष सहाशे रुपये शुल्क आकारले जाते. नारळाच्या झाडाबाबत दुसऱ्याने तक्रार केली असेल तरी मूळ मालकाची फळे व झावळ्या काढण्यासाठी संमती लागते. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी नारळाची झाडे तोडण्यासाठी आलेल्या अर्जांपैकी सर्वच्या सर्व साडेतीनशे अर्ज फेटाळून लावले आहेत. पर्यावरण रक्षणासाठी पालिका प्रयत्नशील आहे.
>
> **– जी. आर.गोसावी,**
> मुख्य उद्यान अधीक्षक, पिंपरी चिंचवड महापालिका
> मुख्य उद्यान अधीक्षक, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिका वृक्ष प्राधिकरणानेही अंमलात आणावा; तसेच वृक्षतोडीसाठी अर्ज आल्यावर त्याबाबत प्रत्यक्ष माहिती घेणे, पंचनामा या नेहमीच्या सोपस्काराबरोबरच अशा प्रकरणात त्या धोकादायक झाडांचे छायाचित्र घेऊन मगच तो विषय वृक्ष प्राधिकरणसमोर मांडण्याची ठाणे महापालिकेची पद्धत आणि वृक्षतोड प्रकरणाबाबत वृत्तपत्रात जाहिरात नोटीस देऊन मगच त्यावर निर्णय घेण्याची पुणे महापालिकेची पद्धत पिंपरी चिंचवड महापालिकेने ही अंमलात आणावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## पुणे-लोणावळा लोकलच्या फेऱ्या वाढविणार

# पुणे रेल्वे स्थानकाचा लवकरच कायापालट!

## इंदूराणी दुबे यांनी स्वीकारला पुणे रेल्वेच्या व्यवस्थापकदाचा कार्यभार

**पुणे। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सुविधेच्या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा उभारण्यावर भर देण्यात येणार असल्याचा निर्धार पुणे रेल्वेच्या नव्या व्यवस्थापक इंदू राणी दुबे यांनी व्यक्त केला. स्थानकातील सर्व फलाटांची लांबी वाढविणे, स्थानकात पादचारी पुलाला जोडण्याच्या लिफ्ट बसविणे, सीसीटीव्ही यंत्रणेच्या जाळ्याच्या विस्तारासह पुणे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी विकसित करण्यात येत असलेल्या हडपसर टर्मिनलबाबतही योजनात्मक पद्धतीने काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

इंदू राणी दुबे यांनी नुकताच पुणे रेल्वेच्या व्यवस्थापकदाचा कार्यभार स्वीकारला. शुक्रवारी (२ डिसेंबर) झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पुणे विभागाशी संबंधित विविध योजनांची माहिती दिली. अपर व्यवस्थापक बी. के. सिंह, वरिष्ठ अभियंता पी. के. चतुर्वेदी, वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक डॉ. मिलिंद हिरवे, वरिष्ठ वाहतूक व्यवस्थापक डॉ. स्वप्निल नीला, जनसंपर्क अधिकारी मनोज झंवर आदी अधिकारी त्या वेळी उपस्थित होते. दुबे म्हणाल्या, की पुणे स्थानकावरील दोन फलाटावरच सध्या २६ डब्यांच्या गाड्या उभ्या करता येऊ शकतात. पुढील काळात सर्वच फलाटांची लांबी वाढविण्यात येणार आहे. त्याबाबतची योजना तयार असून, लवकरच त्याबाबत काम सुरू करण्यात येणार आहे. स्थानकातील पादचारी उड्डाणपुलाच्या प्रश्नातही लक्ष घालण्यात येणार आहे. पुलाला जोडण्यासाठी स्थानकात पाच लिफ्टला मंजुरी मिळाली आहे. त्या बसविण्याची कार्यवाही लवकरच सुरू होईल. रॅम्प सुविधेबाबतही नियोजन करण्यात येणार आहे. स्थानकातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची यंत्रणा जुनी झाली असून, ती बदलून सीसीटीव्हीचे जाळे आणखी सक्षम करण्यात येणार आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांची संख्यावाढ, पुण्याहून अयोद्धेसाठी स्वतंत्र गाडीची सुविधा आदींबाबतही



### पुणे-लोणावळा लोकल वाढविणार

पुणे-लोणावळा दरम्यान धावणाऱ्या लोकलच्या दुपारच्या फेऱ्या पूर्ववत न झाल्याने या मार्गावर दररोजचा प्रवास करणारे विद्यार्थी आणि नोकरदारांची होणाऱ्या गैरसोयीबाबत इंदू दुबे यांना विचारले असता, प्रवाशांच्या सुविधेच्या दृष्टीने दुपारच्या वेळेतील लोकलच्या फेऱ्या पूर्ववत करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. सध्या पुणे-लोणावळा मार्गावर स्वयंचलित सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे. त्यातून लांब पल्ल्याच्या गाड्यांचा वेग प्रतितास ११० वरून १३० किलोमीटर करण्यात येईल. या नियोजनातून उपनगरीय वाहतुकीतील फेऱ्यांची संख्या वाढू शकेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पुणे-दौंड मार्गावर डेमू लोकलऐवजी पुढील काळात मेमू लोकल चालविण्यात येणार असून, डब्यांची संख्याही वाढविली जाईल, असेही या वेळी सांगण्यात आले.

### खडकी स्थानकाचाही विस्तार

खडकी रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक चारच्या विस्ताराचे काम लवकरच हाती घेण्यात येणार असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या फलाटाच्या विकासासाठी मध्य रेल्वेकडून २९ कोटी रुपयांचा प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे पुढील सहा ते सात महिन्यांत हे काम पूर्ण होऊ शकणार आहे.

# दहा कोटींची ड्रेनेज लाइन, तरीही मैलापाणी ओढ्यात!

## ड्रेनेज लाइन राजकीय श्रेय लाटण्यासाठी टाकण्यात आली का? नागरिकांचा सवाल

**कात्रज। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

गुजर-निंबाळकरवाडी ओढ्यात ड्रेनेजची लाइन सोडण्यात आल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे या ओढ्यालगत पाच-सात फुटावरून 10 कोटी रुपयांची ड्रेनेज लाइन गेलेली असताना मुख्य लाइन ही वाहिनी जोडण्याचेही काम अद्यापही ड्रेनेज विभागाकडून झाले नाही. त्यामुळे



मुख्य ड्रेनेज लाइन राजकीय श्रेय लाटण्यासाठी टाकण्यात आली का? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

निंबाळकरवस्ती, गुजरवस्ती परिसरात नागरिक राहतात. परिसरातील ओढ्यात ड्रेनेजची लाइन सोडण्यात आल्याने मैलायुक्त पाणी नैसर्गिक प्रवाह असलेल्या ओढ्यातून वाहत आहे. यामुळे ओढ्याच्या भागात डास, माशा यांचा प्रादुर्भाव वाढला आहे. तसेच ओढ्यालगत राहणाऱ्या नागरिकांना, तसेच रस्त्याने जाणाऱ्या पादचाऱ्यांना या पाण्याच्या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे.

या भागातील लहान-मुले व नागरिक आजारी पडत असून, त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मात्र, याकडे ड्रेनेज विभागाचे दुर्लक्ष होत असून नागरिकांतून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. मांगडेवाडी व भिलारेवाडी भागातदेखील अनेक ठिकाणी उपवाहिन्या न जोडल्याने मैलायुक्त पाणी ओढ्यातून वाहत असल्याचे विदारक चित्र सध्या दिसून येत आहे. या संदर्भात ड्रेनेज विभागाचे कनिष्ठ अभियंता स्वाती बिराजदार यांच्याशी संपर्क केला असता संपर्क झाला नाही.

कात्रज तलावात येणारे मैलायुक्त पाणी रोखण्यासाठी गुजर-निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, भिलारेवाडी गावांसाठी 10 कोटींची ड्रेनेज लाइनचे काम गेल्या काळात हाती घेण्यात आले होते. या योजनेचे श्रेय घेण्याचा प्रयत्नही राजकीय नेत्यांकडून झाला . मात्र, मुख्य ड्रेनेज लाइन काम पूर्ण होऊन उपवाहिन्या या वाहिनीला न जोडल्याने ड्रेनेजचे पाणी ओढ्यातून वाहतच आहे. त्यामुळे मुख्य ड्रेनेज लाइन तलाव व ओढे मैलायुक्त पाणी मुक्त करण्यासाठी केली की, राजकीय श्रेयवादासाठी, असा सवाल नागरिक उपस्थित करू लागले आहेत.

## संपादकीय »

# अपंगांसाठी स्वतंत्र मंत्रालय...

***राज्यात आता अपंग मंत्रालय स्थापन होणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याला मंजुरी दिली आहे. अपंगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. असे स्वतंत्र मंत्रालय स्थापन व्हावे म्हणून आमदार बच्चू कडू अनेक वर्षांपासून संघर्ष करत आहेत. अखेर त्यांच्या लढ्याला यश आले आहे.***

अपंगांना स्वाधार योजना, गाडगेबाबा घरकुल योजनेचा लाभ मिळावा, तसेच मूकबधिरांना खासगी क्षेत्रात काम मिळावे यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. अपंगांसाठी स्वतंत्र विद्यापीठ, रोजगार आणि शिक्षणामध्ये त्यांना संधी, मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी 'साइन लँग्वेज' विकसित करणे या गोष्टींची अंमलबजावणी आवश्यक आहे. अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणे गरजेचे आहे. यासाठी आता प्रयत्न केले जाणार आहेत. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातल्या अपंगांना शासकीय योजनांचा लाभ त्वरित मिळण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अपंग भवन उभारण्यात येणार आहे. राज्यातील सर्व जिल्हा परिषदा, महानगरपालिका आणि स्थानिक आमदार निधी यांच्या अर्थसाहाय्याने हे भवन बांधण्यात येणार आहे. या माध्यमातून त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सध्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागातील अपंग कल्याण आयुक्तालयाच्या माध्यमातून अपंगांसाठीच्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. अपंग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम कमी असून ती मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीइतकी करण्यात येईल. अकोला आणि ठाण्याच्या धर्तीवर घरोघरी जाऊन अपंगांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणामुळे अपंगांची माहिती संकलित होऊन त्यांना योजनांचा लाभ देणे सुलभ होणार आहे. बच्चू कडू यांनी महाराष्ट्रामध्ये अपंग मंत्रालय व्हावे म्हणून गेली २० ते २५ वर्षे केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्याशी पत्रव्यवहार केलेला आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्न, लक्षवेधी उपस्थित केले. लेखी पत्रे दिली. आंदोलने केली. त्यामुळे शासनाला गेल्या दहा वर्षांमध्ये जवळजवळ १२५ शासन निर्णय काढावे लागले आहेत. राज्यामध्ये अपंग महामंडळामार्फत कर्जवाटप तातडीने करण्यात यावे आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीप्रमाणे ते माफ करण्यात यावे, जिल्ह्यातील समाज कल्याण विभागामधून देण्यात येणाऱ्या बीज भांडवल कर्जाची मर्यादा वाढवून ते तीन लाखांपर्यंत करण्यात यावे.

# होय, आम्ही 'उजवेच' आहोत...



वलयांकित

**अ‍ॅड्.आशीष शेलार**
आमदार



**आज देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना आपल्याला या देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून केलेल्या भाषणाचे स्मरण जर आपण केले, तर त्यावेळी पंतप्रधान म्हणाले होते की, भारताची सेवा म्हणजे खितपत पडलेल्या लाखो लोकांची सेवा... म्हणजेच दारिद्र्य, अज्ञान, रोगराई आणि संधीच्या असमानतेचा शेवट...**

देश स्वतंत्र झाला त्यावेळी देशासमोर आव्हान होते ते, दारिद्र्य, अज्ञान व रोगराईचे... त्यानंतर २०१४ ला जेव्हा देशाच्या पंतप्रधानपदी मा. नरेंद्र मोदी विराजमान झाले, त्यावेळी त्यांनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना 'घर घर शौचालय'ची घोषणा केली. स्वतंत्र भारतात जन्मलेले मोदी हे पहिले पंतप्रधान झाले आणि लाल किल्ल्यावरून भाषण करताना जेव्हा त्यांनी ही घोषणा केली, त्यावेळी त्यांच्यावर टीका करणारे कमी नव्हते. पण, त्याची तमा न बाळगता पंतप्रधानांनी ही घोषणा केली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी गरिबीतून आलो आहे. गरिबी काय असते याची मला कल्पना आहे. त्यामुळे गरिबाला सन्मान मिळावा म्हणून मी काम करणार आहे.

देशाच्या स्वातंत्र्याचा गेल्या ७५ वर्षांचा विचार जेव्हा आपण करायला लागतो, तेव्हा या दोन पंतप्रधानांच्या भाषणांचा कालावधी आपण सजगपणे मोजला, तोलला किंवा त्यांची मांडणी केली, तर आपण कुठून कुठपर्यंत आलो आणि इथपर्यंत येताना काय बाकी राहिले याची कल्पना आपल्याला येते. या देशात ७५ वर्षांत काहीच घडले नाही, असे मला अजिबात म्हणायचे नाही. बरेच काही घडले; पण जे घडले किंवा जे घडवले गेले, त्याचा केंद्रबिंदू सामान्य गरीब माणूस होता का, त्याच्या जगण्यात किती बिंदूंनी फरक पडला याचे मूल्यमापन आपण करणे गरजेचे आहे.

आज देशाची लोकसंख्या १२८ कोटी आहे. त्याच्या २९ टक्के म्हणजेच ३७ कोटी इतकी लोकसंख्या ही दारिद्र्यरेषेखालील आहे. आपल्या देशात अन्न-वस्त्र-निवारा या तीन मूलभूत गरजाही पूर्ण न होणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. आपल्या देशात 'गरिबी हटाव'च्या घोषणा खूप झाल्या; पण गरिबी अमर झाली आणि घोषणा तर अजरामर झाल्या, असे चित्र आहे. एकीकडे वाढत जाणारी लोकसंख्या; दुसरीकडे संधींचे असमान वाटप, एकीकडे रोजगाराच्या घटणाऱ्या संधी; तर दुसरीकडे काही मोजक्या धनिकांकडे वाढत जाणारा संपत्तीचा संचय यामुळे गरीब आणि श्रीमंत यातील दरीही वाढतच गेली. अशा वेळी या देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले की, ज्या श्रीमंत वर्गातील लोकांना गॅसची सबसिडी मिळते, त्यांनी ती गरिबांसाठी सरकारला परत करावी. त्याला प्रतिसाद देणाऱ्या नागरिकांची संख्या काही कोटींमध्ये होती.

आपण शिक्षणाने साक्षरतेचे प्रमाण वाढविले; पण या देशातील जनतेच्या अज्ञानाचा अंध:कार पूर्णपणे दूर झाला, असे म्हणता येणार नाही. आजही आपला देश पूर्णपणे साक्षर नाही. आपल्या देशाचे साक्षरतेचे प्रमाण हे ७८ टक्के आहे. म्हणजे आपल्या देशातील २२ टक्के म्हणजे २८ कोटी लोक निरक्षर आहेत.

कोरोना काळात आपण रोगराईला कसे तोंड देऊ शकलो, आपल्याकडे किती आरोग्य यंत्रणा होती, किती असायला हवी याचाही स्पष्ट अंदाज आपल्याला आलेला आहे. त्यामुळे देश स्वतंत्र होत असताना जी आव्हाने देशासमोर होती, ती संपलेली नाहीत. ज्यावेळी या देशातील राजकारणाने कूस बदलली आणि डाव्या दिशेकडून उजवीकडे राजकीय सूर्य वळला. त्यानंतर रातोरात हे बदल होणार नव्हते याची पूर्ण कल्पना असलेले एक सक्षम नेतृत्व देशाला लाभले ते म्हणजे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी होय.

ज्यावेळी देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याच्या तयारीत होता, त्याच वेळी या देशातील जनतेने राजकारणाची कूस बदलली. त्यामुळे स्वाभाविकपणे आता देशाची बांधणी आणि प्रगतीचा एक वेगळा आलेख मांडवा लागणार होता.

# 'कृषि'तुल्य शरद पवार!



वलयांकित

**प्रभाकर देशमुख,**
निवृत्त IAS अधिकारी



**भारतातील ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून, अन्न पौष्टिकता व रोजगार सुरक्षेच्या दृष्टीने आर्थिक प्रगतीइतकीच कृषी क्षेत्राची प्रगतीही फार महत्त्वाची आहे. अन्नसुरक्षा ही देशाच्या संरक्षणाइतकीच महत्त्वाची ठरली आहे. ही बाब विचारात घेऊन २००४ मध्ये आदरणीय पवारसाहेबांनी एनडीए सरकारमध्ये कृषी खाते मागून घेतले. कृषी हा विषय केवळ साहेबांसाठी जिव्हाळ्याचा नाही, तर तो त्यांच्या रक्तात भिनलेला आहे, त्याची प्रचिती साहेबांनी कृषी विभागासाठी घेतलेल्या निर्णयांतून येते.**

प्रथमतः कृषी संशोधनातून अद्ययावत तंत्रज्ञान, नवीन वाणांची निर्मिती, कृषी संशोधन यासाठी असलेली २,९३३ रुपये कोटींची तरतूद दुपटीपेक्षा अधिक केली. संपूर्ण देशात ६३७ कृषी विज्ञान केंद्रांचे जाळे निर्माण केले. त्यामागे कृषी, तसेच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व मत्स्यपालन इत्यादी संलग्न व्यवसायांतून शेतकऱ्यांना त्यांचा हरवलेला आत्मविश्वास परत मिळवून देण्याचा मुख्य उद्देश होता. आज या केंद्रांनी पाणी व खत व्यवस्थापन, अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांच्या जाती यामध्ये दिशादर्शक काम उभे केले आहे. साहेबांचा दूरदृष्टीपणा, विचारांची स्पष्टता, कष्ट करण्याची प्रचंड क्षमता, वक्तशीरपणा व निर्णयक्षमता अचंबित करणारी आहे. देशाच्या अन्नसुरक्षेसाठी 'राष्ट्रीय अन्नसुरक्षा मिशन' त्यांच्या पुढाकाराने सुरू झाले. यातून देशात अन्नधान्याचे उत्पादन २६० दशलक्ष टनांपेक्षा जास्त होण्यात यश आले. भारत स्वतःची गरज भागवून १६ देशांना अन्नपुरवठा करणारा देश ठरला. पाच वर्षांत ८० हजार कोटी रुपयांची निर्यात २.३२ लाख कोटी रुपये करून दाखविली. पवारसाहेबांच्या या धोरणामुळे निर्यात तिपटीपेक्षा अधिक वाढली. फूड सिक्युरिटी कायदा करून देशातील ८२ कोटी लोकांसाठी अन्नसुरक्षा सुरू करण्यात आली.

सन २००९-१० मध्ये संपूर्ण देशात दुष्काळ होता. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांनी अन्नधान्य उत्पादन २०-२५ टक्क्यांनी कमी होईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. भारतासाठी ही चिंतेची बाब होती. शरद पवारसाहेबांनी देशातील सर्व राज्यांचे कृषिमंत्री, सचिव, कृषी आयुक्त, विद्यापीठे यांच्यासोबत दोन दिवसांचे चर्चासत्र ठेवले. मी या कृषी चर्चासत्रात कृषी आयुक्त म्हणून हजर होतो. दुसऱ्या दिवशी राज्यांनी ज्या ज्या मागण्या केल्या, त्या साहेबांनी मान्य केल्या. त्यांनी तातडीने महत्वाचे पूरक निर्णय घेतले. अन्न उत्पादनाचा आराखडा आणि काटेकोर नियोजन केले. दुष्काळी परिस्थिती असताना तज्ज्ञांचा अंदाज खोटा ठरवीत त्या वर्षीही सरासरीइतके अन्नधान्याचे उत्पादन झाले. हे केवळ साहेबांमुळे शक्य झाले.

सन २००९-१० मध्ये देशातील ज्या राज्यांनी व संस्थांनी कृषी उत्पादनवाढीसाठी उत्कृष्ट काम केले होते. त्याबद्दल तत्कालीन परराष्ट्रमंत्री व माजी राष्ट्रपती कै. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्या वर्षी महाराष्ट्राचा पश्चिम विभागात सर्वांत जास्त कृषी उत्पादन केल्याबद्दल गौरव करण्यात आला. त्यावेळी मी कृषी आयुक्त म्हणून हजर होतो. त्यावेळी आदरणीय प्रणव मुखर्जी म्हणाले होते, "कृषी क्षेत्रात माझे मित्र व सहकारी शरदराव पवार यांचे काम अद्वितीय आहे. त्यांचा मोठा अनुभव, कामाचे नियोजन व कार्यक्षमता यामुळे आम्हाला देशाच्या अन्नसुरक्षेची काळजी वाटत नाही." साहेबांबद्दल व्यक्त करण्यात आलेल्या या भावना कृषी क्षेत्रातील त्यांचे मोठे योगदान अधोरेखित करतात. सांगोल्यात आदल्या दिवशी अतिवृष्टी झाली. साहेब दुसऱ्या दिवशी सकाळी हेलिकॉप्टरने सांगोल्यात शेतकऱ्यांच्या शेतावर गेले आणि त्यांना मदत उपलब्ध करून दिली. कष्टकरी शेतकऱ्यांबद्दल एवढी तत्परता व संवेदनशीलता क्वचितच पाहायला मिळते.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री असताना साहेबांनी रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड योजना सुरू केली. त्यासाठी काही क्लस्टर निवडले. सरकारने मोठ्या प्रमाणात मोफत फळबाग लागवड करून दिली. मी जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असताना वेंगुर्ल्याजवळ उभा दांडा गावात स्वच्छता अभियानांतर्गत तपासणीसाठी गेलो होतो. गावातील सुंदर व भव्य मंदिराचे बांधकाम पाहून आश्चर्य वाटले. लोकांकडे याबाबत विचारणा केली. त्यांनी सांगितले, "रोजगार हमी योजनेतून मोठ्या प्रमाणात आंबा व काजूची लागवड करण्यात आली. फळाच्या प्रत्येक पेटीमागे तीन रुपयांप्रमाणे आकारणी केली आणि त्यातून मिळालेल्या पैशातून गावाने हे मंदिर बांधले आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ईडब्ल्यूएसमधून मराठा उमेदवारांना नियुक्तीस हायकोर्टाची स्थगिती!

## सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना आर्थिक मागास प्रवर्गातून नियुक्ती देण्यावर आक्षेप

। मुंबई । महाईन्यूज
। निलेश दुटाळ

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा 2019 मध्ये सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून (एसईबीसी) अर्ज केलेल्या 111 उमेदवारांची आर्थिक मागास प्रवर्गातून (ईडब्ल्यूएस) देण्यात येणारी नियुक्ती पत्रे उच्च न्यायालयाने गुरुवारी रोखली.**

सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना आर्थिक मागास प्रवर्गातून नियुक्ती देण्यावर आक्षेप घेत ईडब्ल्यूएसच्या तीन उमेदवारांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. या याचिकेवर गुरुवारी सायंकाळी उशिरा मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती अभय आहुजा यांच्या खंडपीठाने तातडीची सुनावणी घेतली. या नियुक्त्यांना स्थगिती देत खंडपीठाने याचिकेची सुनावणी शुक्रवारी 2 डिसेंबरला निश्चित केली.

एमपीएससीने निवड केलेल्या 111 उमेदवारांना राज्य सरकारकडून नियुक्ती पत्रांच्या वाटपाचा कार्यक्रम गुरुवारी आयोजित केला आहे, याकडे लक्ष वेधत याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला तातडीने सुनावणी घेण्याची विनंती केली होती. न्यायालयाने त्यांचा आक्षेप विचारात घेत 111 उमेदवारांना ईडब्लूएस प्रवर्गातून देण्यात येणारी नियुक्ती स्थगित केली. या 111 उमेदवारांना आता नियुक्ती दिल्यास गोंधळाची परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे नियुक्तीला तूर्तास स्थगिती देणे योग्य राहील, असे न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. अभय अहूजा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोरील (मॅट) प्रलंबित प्रकरणांत आम्ही हस्तक्षेप करत नाही. परंतु खटल्याचे महत्त्व पाहून मॅटने जानेवारीपूर्वी प्रकरणे निकाली काढावे असेही खंडपीठाने स्पष्ट केले. या 111 उमेदवारांच्या बाजूने निकाल लागल्यास त्यांची ज्येष्ठतेनुसार, 1 डिसेंबर तारखेनुसारच नियुक्ती निश्चित केली जाईल, अशी शाश्वतीही न्यायमूर्तींनी दिली.

2019 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) अंतर्गत घेण्यात आलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील पदांसाठी 1143 उमेदवारांची निवड करण्यात



आली होती. सर्वोच्च न्यायालयाने मागील वर्षी मे महिन्यात मराठा समाजाला आरक्षणाला स्थगिती दिल्यानंतर ईडब्ल्यूएसमधील आरक्षित जागांवर मराठा समाजातील उमेदवारांना सामावून घेण्यात आले होते.त्यातील 111 नियुक्त्यांना काही उमेदवारांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे (मॅट) दाद मागितली. मॅटने या प्रकरणाची अंतिम सुनावणी 2 डिसेंबर रोजी निश्चित करताना उमेदवारांच्या नियुक्त्या करण्याची अंतरिम मुभा दिली होती. या नियुक्त्या राज्य सरकारद्वारे जारी केल्या जाऊ शकतात परंतु त्या अर्जावरील अंतिम निकालाच्या अधीन असल्याचेही स्पष्ट केले होते. मॅटच्या या निर्णयाला आर्थिक मागास वर्गातील तीन उमेदवारांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. या 111 उमेदवारांची नियुक्ती झाल्यास आपल्या नोकरीवर परिणाम होईल, असा दावा करत सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना आर्थिक मागास प्रवर्गातून नियुक्ती देण्यावर आक्षेप घेत ईडब्ल्यूएसच्या या तीन उमेदवारांनी उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल केली.याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती याचिकाकर्त्यांनी केली. त्यावर मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्या. अभय आहुजा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.मराठा मोर्चाचे समन्वयक आणि शिंदे गटाचे प्रवक्ते संजीव भोर-पाटील म्हणाले, या निर्णयात खोडा घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. या नियुक्त्यांचे श्रेय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळू नये, म्हणून कोण राजकारण करत आहे,

### ▶▶| गुंता नको म्हणून स्थगिती

एसईबीसीच्या उमेदवारांना ईडब्ल्यूएस प्रवर्गातून नियुक्ती दिली गेल्यामुळे आमच्या हक्कांवर गदा येत आहे, असा दावा याचिकाकर्त्यांतर्फे खंडपीठापुढे करण्यात आला. राज्य सरकारने विविध विभागांमध्ये अभियांत्रिकी सेवेच्या जागांसाठी नियुक्ती प्रक्रिया सुरू केली आहे. ईडब्ल्यूएसच्या उमेदवारांचा हक्क विचारात घेत न्यायालयाने एसईबीसीच्या 111 उमेदवारांना ईडब्ल्यूएसमधून देण्यात आलेली नियुक्ती तातडीने थांबवावी, विनंती केली त्याची गंभीर दखल घेत न्यायालयाने घेतली. 1 डिसेबर रोजी होणाऱ्या नियुक्त्या केल्यास गुंता निर्माण होईल असे मत व्यक्त करत या 111 उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यास स्थगिती देत न्यायालयाने याचिकेची सुनावणी तहकूब ठेवली.

### ▶▶| कार्यक्रम सुरु असतानाच

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गुरुवारी ही नियुक्ती पत्रे दिली जात असतानाच ही स्थगिती आली. मराठा आरक्षणाचा निकाल सर्वोच्च न्यायालयाकडे प्रलंबित आहे. मात्र, अलीकडेच 50 टक्के आरक्षण मर्यादेच्या पलीकडे जात सर्वोच्च न्यायालयाने आर्थिक दुर्बल घटकांना (ईडब्ल्यूएस) नोकऱ्यांमध्ये 10 टक्के आरक्षण देणारे विधेयक वैध ठरवले. मोदी सरकारने 2019 मध्ये हे आरक्षण देणारे विधेयक बहुमताने मंजूर केले होते. मराठा आरक्षणाच्या प्रतीक्षेत असलेल्या आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या उमेदवारांना या आरक्षणाचा लाभ देण्याचा निर्णय राज्य सरकारने गेल्याच महिन्यात घेतला. ज्या उमेदवारांनी आपल्या अर्जात ईडब्ल्यूएसचा पर्याय निवडला आहे आणि ज्यांची निवड 9 सप्टेंबर 2020 च्या आधी झालेली आहे, अशा मराठा उमेदवारांना आर्थिक दुर्बल घटकांतून नियुक्त्या दिल्या जातील. या नियुक्त्या न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहतील, असेही राज्य सरकारने स्पष्ट केले होते. या निर्णयानुसार तब्बल 1143 उमेदवारांना न्याय मिळण्याचा मार्ग खुला झाला.

# ठाकरे गटाला पुन्हा धक्का! वैभव नाईकांनंतर आणखी एका आमदाराला ACBची नोटीस

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यात शिवसेनेत दोन गट निर्माण झाल्यानंतर अनेक घडामोडी घडल्या. त्यानंतर शिवसेनेच्या ठाकरे गटातील आमदार, खासदार आणि मंत्री शिंदे गटात जाऊ लागले. जे काही निष्ठावंत समजले जातात त्यांना नोटिस आणि दबाव टाकला जात असल्याच्या चर्चा सुरू आहेत. अशातच शिवसेनेचे ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांच्यानंतर आता राजापूर विधानसभा मतदारसंघाचे ठाकरे गटाचे आमदार राजन साळवी यांना एन्टी करप्शन ब्युरोकडून नोटीस मिळाली आहे.

आमदार राजन साळवी यांना आता एसीबीने चौकशी करण्यासाठी नोटीस जारी केली आहे. यामुळे ठाकरे गटात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. कोकणमधील राजन साळवी हे शिंदे गटात सहभागी न होता उद्धव ठाकरे यांच्याबरोबर कायम राहिलेत. याआधी माझी निष्ठा बाळासाहेबांच्या चरणी आहे आणि त्यानंतर उद्धव ठाकरे यांच्यासोबत मी कायम आहे आणि असेल, अशी प्रतिक्रिया साळवी यांनी दिली. दरम्यान मालमत्तेच्या चौकशीच्या संदर्भात दोन दिवसांनी म्हणजेच येत्या 5 डिसेंबरला हजर राहण्याचे आदेश देण्यात आलेत.

# अब्दुल सत्तारांच्या अडचणीत वाढ?

## आक्षेपार्ह व्यक्तव्याबद्दल राज्यपालांचे थेट मुख्यमंत्र्यांना पत्र

। मुंबई । महाईन्यूज ।

शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी अलीकडेच काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. त्यानंतर राज्यातील वातावरण चांगलचं तापलं होतं. अब्दुल सत्तार यांना पदावरून काढण्याची मागणी झाली होती. त्यांच्या शासकीय निवासस्थानाची तोडफोड करण्यात आली होती. त्यानंतर प्रकरण आणखी पेटलं होतं. मात्र या प्रकरणाची दखल थेट राज्यपालांनी घेतली असून कार्यवाहीसाठी त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवलं आहे.



या संदर्भात माहिती राष्ट्रवादीच्या खासदार फौजिया खान यांनी दिली आहे. त्यामुळे आता अब्दुल सत्तार यांच्याबाबत मुख्यमंत्री शिंदे काय निर्णय घेणार? याकडे सर्वांच लक्ष्य असणार आहे. दरम्यान सत्तारांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे राज्यभरात संताप व्यक्त करण्यात आला होता. त्यांची मंत्रिपदावरून हकालपट्टी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली होती. त्यानंतर राष्ट्रवादीच्या महिला नेत्यांच्या शिष्टमंडळाने राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना भेटून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी पत्राद्वारे निवेदन दिलं होतं.

राष्ट्रवादीच्या महिला नेत्यांच्या शिष्टमंडळाने दिलेल्या या निवेदनाची राज्यपालांनी दखल घेतली असून त्यासंबधी पत्र पुढील कार्यवाही करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आलं आहे. राज्यपालांनी पाठवलेल्या निवेदनावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय भूमिका घेणार? अब्दुल सत्तार यांच्यावर नेमकी काय कारवाई होणार? याकडे राज्याचं लक्ष लागून आहे.

# छत्तीसगडमध्ये आता 76 टक्के आरक्षण!

## विधानसभेत दोन विधेयकं एकमतानं मंजुर

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।




राज्यातील एकूण आरक्षण ७६ टक्क्यांपर्यंत वाढवण्यासंदर्भातील दोन विधेयकं छत्तीसगड विधानसभेत एकमताने पारित झाली आहेत. नोकऱ्यांसह शैक्षणिक संस्थांमध्ये हे आरक्षण लागू असणार आहे. भुपेश बघेल यांच्या काँग्रेस सरकारने आरक्षणासंदर्भात हे ऐतिहासिक पाऊल उचललं आहे. अनुसूचित जमातींसाठी (एसटी) ३२ टक्के, अनुसूचित जातींसाठी (एससी) १३ टक्के, इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) २७ टक्के आणि इतर कोणत्याही कोट्यात समाविष्ट नसलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ४ टक्के आरक्षणाची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे, अशी माहिती छत्तीसगडचे मुख्यमंत्री भुपेश बघेल यांनी दिली आहे. या विधेयकांना राज्यपालांनी संमती दिल्यास त्याचे कायद्यात रुपांतर होईल. ही विधेयकं मंजुर करण्यासाठी छत्तीसगड विधानसभेचं विशेष अधिवेशन बोलवण्यात आलं होतं. न्यायालयाच्या निकालानुसार ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण घटनाबाह्य असताना छत्तीसगड सरकारने हा धाडसी निर्णय घेतला आहे. २०१२ मधील तत्कालीन भाजपा सरकारचा आदेश रद्द ठरवून उच्च न्यायालयाने आदिवासींच्या कोट्यात २० टक्क्यांनी घट केली होती. याविरोधात राज्यभरातील आदिवासी समाजाने तीव्र आंदोलनं केली होती. आगामी वर्षात छत्तीसगडमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील एकूण आरक्षणामध्ये वाढ करण्याचा निर्णय बघेल यांनी घेतला आहे. संविधानाच्या नवव्या अनुसूचीत हे आरक्षण सुचीबद्ध करावे, अशी विनंती छत्तीसगड सरकार केंद्र सरकारला करण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त 'एनडीटीव्ही' या वृत्त वाहिनीने दिले आहे. दरम्यान, ही विधेयकं पटलावर मांडताच छत्तीसगड विधानसभेत भाजपा आणि काँग्रेसमध्ये मोठी खडाजंगी पाहायला मिळाली. अखेर दीर्घ चर्चेनंतर ही विधेयकं विधानसभेत मंजुर करण्यात आली.

## अफगाणिस्तानातून अमेरिकन सैन्य माघारी गेल्यापासून अमली पदार्थ तस्करीत वाढ

। मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

4 डिसेंबर रोजी होणाऱ्या नौदल दिनाच्या निमित्ताने वेस्टर्न नेव्हल कमांडची पत्रकार परिषद शनिवारी मुंबईत झाली. या प्रसंगी व्हाईस ॲडमिरल अजेंद्र बहादूर सिंग, फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ वेस्टर्न नेव्हल कमांड, यांनी दिनाच्या वार्षिक पत्रकार परिषदेत प्रसार माध्यमांना संबोधित केले.माध्यमांशी बोलताना कमांडर-इन-चीफ यांनी अमली पदार्थांच्या तस्करीची प्रकरणे पकडली जात असतील तर याचा अर्थ अशा प्रकरणांमध्ये वाढ झाली आहे.

सागरी मार्गाने जे अमली पदार्थांची तस्करी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशी प्रकरणे पकडण्याचा आमचा प्रयत्न असून त्यात आम्हाला मोठ्या प्रमाणावर यशही मिळत आहे. या शब्दात, वेस्टर्न नेव्हल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ व्हाईस ॲडमिरल अजेंद्र बहादूर सिंग यांनी सागरी मार्गाने अमली पदार्थांच्या तस्करीच्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्याचे मान्य केले आहे. अफगाणिस्तानातून अमेरिकन सैन्य माघारी गेल्यापासून अफगाणिस्तानात तयार होणारे अंमली पदार्थ कुठे ना कुठे निर्यात होत आहेत. जमीन मार्गाने किंवा सागरी मार्गाने निर्यात करता येते. आपल्या संबोधनात, सुरक्षा प्रदान करण्यासाठी आणि आमच्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी सर्व सागरी क्षेत्रांमध्ये वेस्टर्न नेव्हल कमांडद्वारे जहाजे, पाणबुड्या आणि विमानांच्या विस्तृत तैनातीबद्दल माहिती दिली.



## मंदिरांमध्ये शुद्धता आणि पावित्र्य जपण्यासाठी मोबाईलवर बंदी!

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**मद्रास उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण आदेश!**



अनेक मंदिरांमध्ये 'मोबाईल बंद ठेवा', 'शांतता पाळा', 'फोटो काढण्यास मनाई' अशा सूचना लिहिलेल्या पाहायला मिळतात. मंदिर प्रशासनाकडून या सूचना दिल्या जातात. पण आता थेट मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुरई खंडपीठानं मंदिरांमध्ये मोबाईल फोन वापरण्यास पूर्णपणे बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. तिरुचेंदुरच्या सुब्रह्मण्यमस्वामी मंदिर प्रशासनाकडून यासंदर्भात याचिका सादर करण्यात आली होती. यावर झालेल्या सुनावणीनंतर न्यायालयाने संपूर्ण तामिळनाडूमधल्या मंदिरांमध्ये मोबाईल फोनवर बंदी लागू करण्याचे निर्देश तामिळनाडू सरकारला दिले. यावेळी मंदिरात शुद्धता आणि पावित्र्य राखण्यासाठी हे निर्देश दिल्याचंही नमूद करण्यात आलं आहे.

**याचिका एका मंदिरासाठी, आदेश पूर्ण राज्यासाठी!**

वास्तविक सुब्रह्मण्यमस्वामी मंदिर प्रशासनाने त्या मंदिरात मोबाईल फोनवर बंदी घालण्याची मागणी केली होती. मात्र, आदेश देताना न्यायालयाने संपूर्ण राज्यातील मंदिरांमध्ये मोबाईल फोनवर बंदी लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. मंदिरात पावित्र्य आणि शुद्धता राखली जावी, यासाठी मोबाईल फोनवर बंदी असावी, असं या आदेशांत नमूद केल्याचं वृत्त'लाईव्ह लॉ'नं दिलं आहे.

**काय होती याचिकाकर्त्यांचा दावा?**

गेल्या महिन्यात ही याचिका दाखल करण्यात आली होती. 'सुब्रह्मण्यमस्वामी मंदिर हे एक प्राचीन मंदिर आहे. मंदिराच्या व्यवस्थापनामध्ये 'आगम' नियमावली महत्त्वाची भूमिका पार पाडते. यानुसार मोबाईल फोन किंवा कॅमेरे किंवा फोटोग्राफी याला मनाई करण्यात आली आहे. पण हल्ली मोबाईल

# लोकांच्या इच्छेला प्रतिबिंबित करणारा कायदा सर्वोच्च न्यायालयाने केला रद्द

## धनखड यांचा सूर पहाता येत्या 7 डिसेंबरपासून होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात या मुद्यावर राज्यसभेत चर्चा होण्याची दाट शक्यता

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



संसदेने मंजूर केलेला राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा (एनजेएसी) सर्वोच्च न्यायालयाने ही घटनादुरुस्ती रद्द केली आणि त्या मुद्यावर संसदेत चर्चाही झाली नाही. ही 'अत्यंत गंभीर समस्या' आहे. जगातील इतर कोणत्याही लोकशाहीत अशी उदाहरणे नाहीत, अशा शब्दांत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आपली भावना व्यक्त केली. न्यायमूर्तींच्या नियुक्तीच्या मुद्द्यावरून सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या उपस्थितीतच उपराष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयावर निशाणा साधला.

दिल्लीत काल (शुक्रवारी) आठव्या एल एम सिंघवी स्मृती व्याख्यानात बोलताना धनखड यांनी 'राज्यघटनेच्या प्रस्तावनेतच 'आम्ही भारताचे लोक" असा उल्लेख आहे आणि संसद लोकांच्या इच्छेचे प्रतिबिंबित करते, असे सूचकपणे सांगितले. धनखड यांचा सूर पहाता येत्या ७ डिसेंबरपासून होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात या मुद्यावर राज्यसभेत चर्चा होण्याची दाट शक्यता आहे. संसदेने मंजूर केलेला म्हणजे लोकांच्या इच्छेला प्रतिबिंबित करणारा कायदा सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला आणि जगाला अशा कोणत्याही हालचालींची माहिती देखील नाही, असेही धनखड म्हणाले. घटनेतील तरतुदींचा हवाला देत ते म्हणाले की जेव्हा कायद्याचा एखादा महत्त्वपूर्ण प्रश्न असतो तेव्हा न्यायालयेदेखील त्या समस्येकडे लक्ष देऊ शकतात.


संसद ही लोकांची इच्छा प्रतिबिंबित करते असे सांगून धनखड म्हणाले की याचा अर्थ असा आहे की सत्ता ही लोकांमध्ये, त्यांच्या जनादेशात आणि त्यांच्या विवेकामध्ये असते. २०१५-१६ मध्ये मोदी सरकारने संसदेत एनजेएसी कायदा मंजूर केला होता. न्यायाधीशांच्या नियुकतीचे सर्वाधिकार सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमकडे असण्याच्या तरतुदीला छेद देण्याचा प्रयत्न त्यात होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाने तो कायदा रद्दबातल ठरविला.

"जगात कुठेही असे म्हटले आहे की तरतूद रद्द केली जाऊ शकत नाही. ते जे काही ठोस कायदा म्हणतात त्याचा अर्थ लावला जाऊ शकतो. याकडे दुसऱ्या दृष्टीकोनातून पहा, अशा चैतन्यशील लोकशाहीत मोठ्या प्रमाणात लोकांची नियुक्ती करणारी घटनादुरुस्ती रद्द केली जाते. काय होईल? हे असे मुद्दे आहेत ज्याकडे पक्षपाती दृष्टिकोनातून पाहिले जाऊ नये,' असे त्यांनी नमूद केले.

दरम्यान एनजेएसी कायद्याबाबतच्या न्यायालयीन निकालावर सरकारच्या गोटातून टीका होण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२० मध्ये तत्कालीन ॲटर्नी जनरल मुकूल रोहतगी म्हणाले होते की सर्वोच्च न्यायालयाच्या काही न्यायाधीशांना आता हे समजले आहे की तो कायदा रद्द करणे हा योग्य निर्णय नव्हता. त्या निकालामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरही अस्वस्थ झाले असतील असी कठोर टीका रोहतगी यानी केली होती.

# आलिया भट्टचा 'गंगूबाई काठियावाडी' ऑस्करसाठी सज्ज

यंदा भारतीय चित्रपटांच्या ऑस्करवारीवरून बरेच वाद झाले. 'द काश्मीर फाइल्स' आणि 'आरआरआर'सारख्या जबरदस्त गाजलेल्या चित्रपटांना सोडून एका गुजराती चित्रपटाला ऑस्करला पाठवल्याने बरेच लोक नाराज झाले. 'आरआरआर' या चित्रपटाला तर नंतर बऱ्याच आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात मानाचं स्थान मिळालं. एकंदरच यंदाच्या ऑस्कर निवडीबाबतही प्रेक्षक तसे नाराजच होते.



आता संजय लीला भन्साळी यांच्या 'गंगूबाई काठियावाडी'ला पुढील ऑस्करसाठी पाठवण्याची तयारी सुरू असल्याचं वृत्त समोर आलं आहे. नुकताच हा चित्रपट 'ब्रिटिश अकादमी फिल्म अवॉर्ड (BAFTA) २०२२' या प्रतिष्ठित सोहळ्यासाठी सज्ज होत आहे. तोच या चित्रपटाच्या ऑस्करवारीबद्दल चर्चा सुरू आहे.

आलिया भट्टचा 'गंगूबाई काठियावाडी' हा चित्रपट हुसैन झैदी याच्या प्रसिद्ध 'माफिया क्वीन्स ऑफ मुंबई' या पुस्तकावर बेतलेला आहे. कामाठीपुरा वस्तीतील देहविक्री करणाऱ्या स्त्रियांच्या हक्कासाठी लढणाऱ्या गंगूबाईच्या जीवनापासून याची कथा प्रेरित आहे.

बॉलिवूडसोबतच टॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाच्या जोरावर वेगळं स्थान निर्माण करणारी अभिनेत्री आहे मृणाल ठाकूर. मृणाल गेल्या 10 वर्षांपासून चित्रपटसृष्टीत सन्मान मिळवण्यासाठी धडपडत आहे आणि आता तिच्या या प्रयत्नांना यश आले आहे. 'सीतारामम' चित्रपटातून तिचा अभिनय मोठ्या पडद्यावर झळाळून उठला आहे. 'बाटला हाऊस', 'जर्सी' आणि 'सुपर 30' यांसारख्या चित्रपटांतून आपला ठसा उमटवणाऱ्या मृणाल ठाकूरचा सीतारामममही चांगलाच गाजतोय.

# मृणाल म्हणते,"बॉलिवूडपेक्षा टॉलिवूड परवडलं!"



2012 मध्ये मृणाल ठाकूरने 'मुझसे कुछ कहते हैं, ये खामोशियां' या मालिकेतून कॅमेऱ्यासमोर आपले कौशल्य दाखवण्यास सुरुवात केली. २०१८ साली 'लव्ह सोनिया' या चित्रपटात ती पहिल्यांदा मोठ्या पडद्यावर दिसली. त्यानंतर सुपर ३० सारख्या चित्रपटांमधून आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे

# शेतकऱ्याचा मुलगा अहेमद देशमुख झळकणार मराठी सिनेमात

मुंबई : मराठी फिल्म इंडस्ट्रीत असे बरेचसे कलाकार आहेत, जे गरीब कुटुंबातून आले आणि त्यांनी शून्यातून आपलं विश्व निर्माण केलं. लक्ष्मीकांत बेर्डे, अशोक सराफ अशा दिग्गज मराठी अभिनेत्यांचा यात समावेश होतो. आज आम्ही तुम्हाला अशाच एका अभिनेत्याची ओळख करून देणार आहोत ज्याने स्वकर्तुत्वाने या इंडस्ट्रीत आपली ओळख निर्माण केली आहे.

मित्रांनो, प्रितम पाटील दिग्दर्शित 'ढिंशक्यावSS' हा मराठी सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. या सिनेमातूनही एक असाच नवा चेहरा समोर येणार आहे. अहेमद देशमुख (AHEMAD DESHMUKH) असे या अभिनेत्याचे नाव असून या सिनेमातून तो मराठी फिल्म इंडस्ट्रीत पहिले पाऊल टाकणार आहे. अहेमद देशमुख हा अत्यंत हलाखीची परिस्थिती पाहिलेल्या लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातील उमरगा रेतू गावातील शेतकरी कुटुंबातला मुलगा. आई-वडील, ४ बहिणी, २ भाऊ असे त्याचे कुटुंब. अहमदचे बालपण गोरगरिबीतच गेले. वडिलांची शेतीच्या व्यवसायातून जास्त कमाई होत नव्हती मात्र अशा परिस्थितीतही अहेमदने आपले शिक्षण पूर्ण केले. दरम्यान, काही वर्षे त्याने वडिलांना शेती करण्यात मदतही केली. अहेमदचा लहान भाऊ अपंग असल्याने कुटुंबाची अधिकतर जबाबदारी अहेमद आणि त्याच्या मोठ्या भावावर आली. शेतातील छोटी-मोठी कामे करणे, इतरांकडे ट्रॅक्टरवर काम करणे, विहीरीत क्रेन चालवणे अशी कामे देखील त्याला करावी लागली. परंतु काहीतरी मोठं करण्याचं अहेमदचं स्वप्न त्याला स्वस्थ राहू देत नव्हतं. एकतर नेता किंवा अभिनेता बनायचं हे अहेमदने लहानपणीच ठरवले होते आणि याच स्वप्नासाठी अहेमदने गाव सोडून मुंबईत जाण्याचा निश्चय केला. मुंबईला निघालेला अहेमद मिळेल ते काम करू लागला. परंतु फार काळ तो तिथे टिकू शकला नाही. त्यामुळे नाईलाजाने त्याला गावी परतावे लागले.



पुढे काही दिवस अहेमदने मोठ्या भावाच्या गॅरेजमध्ये काम केले. तिथून काम शिकल्यानंतर अहेमदने स्वतःचे गॅरेजही चालू केले. पुढे ट्रॉली, शेड बनवणे असे व्यवसाय देखील त्याने केले. याचवेळी त्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून राजकारणात देखील आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. राष्ट्रवादी कॉंग्रेसचा धडाडीचा कार्यकर्ता बनून त्याने लोकांची अनेक कामे मार्गी लावत असताना यादरम्यान आपली अभिनयाची आवडही त्याने जोपासली. राजकारणात असतानाच त्याच्या लक्षात आले की आपल्यामध्ये नेत्यापेक्षा अभिनेत्याचे जास्त गुण आहेत. दरम्यानच्या काळात तो अधूनमधून वेळ काढून मुंबई, पुण्याला ऑडिशन देण्यासाठी जात असे. तिथे त्याच्या अभिनयाचे कौतुकही होत असे. परंतु कोणत्या सिनेमात अभिनय करण्याची संधी मात्र त्याला मिळत नव्हती. पण ते म्हणतात, हर किसी का दिन आता है. अगदी तसेच एके दिवशी अहेमदची दिग्दर्शक प्रितम पाटील यांच्याशी भेट झाली आणि मराठी सिनेसृष्टीला एक नवा तारा मिळाला. अशाप्रकारे एका सामान्य कुटुंबातील शेतकऱ्याचा मुलगा अहेमद देशमुख याला मराठी फिल्म इंडस्ट्रीत ब्रेक मिळाला. आता ढिंशक्यावSS चित्रपटात अहेमद देशमुखचा अभिनय पाहणे औत्सुक्याचे असेल.

# रणवीर सिंहच्या 'सर्कस' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहचा आगामी सर्कस चित्रपट सध्या सर्वत्र चर्चेत आहे. येत्या काही दिवसातच हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. मनोरंजनाने परिपूर्ण असलेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांचे भरघोस मनोरंजन केले जाणार असल्याचं म्हटलं जात आहे. दरम्यान, आता नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. हा ट्रेलर पाहून प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी खूप उत्सुक झाले आहेत.




## सर्कसचा प्रदर्शित झाला ट्रेलर

या ट्रेलरची सुरुवात 60 च्या दशकापासून होते. ज्यामध्ये रणवीर सिंह एक 'इलेक्ट्रिक मॅन' आहे म्हणजेच ज्याच्यामधून एक करंट जात असतो. या चित्रपटामध्ये रणवीर सिंहसोबत वरुण शर्मा दखील महत्वाच्या भूमिकेत आहे. ट्रेलरमध्ये चित्रपटातील सर्व कलाकारांची ओळख करताना दिसत आहे. तसच रणवीर सिंह आणि वरुण शर्मा हे दोघेही डबल रोल मध्ये दिसून येत आहेत. त्यामुळे खूप चित्रपटात खूप गोंधळ झालेला देखील दिसेल.

दरम्यान, या ट्रेलरच्या शेवटच्या 20 सेकंदामध्ये तुम्हाला अभिनेत्री दीपिका पादुकोण देखील दिसेल. यामध्ये दीपिका रणवीरसोबत एका गाण्यावर डान्स करताना दिसेल,.

23 डिसेंबर 2022 रोजी होणार चित्रपट प्रदर्शित

सर्कस या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि निर्मिती रोहित शेट्टीने केली असून यामध्ये रणवीर सिंह, पूजा हेगडे, जॅकलीन फर्नांडिस, वरुण शर्मा, जॉनी लीवर हे कलाकार महत्वाच्या भूमिकेत दिसतील.23 डिसेंबर 2022 रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# अक्षय कुमारचा 'राम सेतू' 'या' ओटीटी प्लॅटफॉर्मवर झाला प्रदर्शित

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारचा 'राम सेतू' चित्रपट 25 ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झाला होता. मात्र, बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने फारशी कमाई केली नाही. दरम्यान, आता हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करण्यात आला आहे. परंतु हा पाहण्यासाठी तुम्हाला अधीक किंमत मोजावी लागणार आहेत.

## प्राईम व्हिडीओवर झाला प्रदर्शित

अक्षय कुमारचा 'राम सेतू' प्राईम व्हिडीओवर प्रदर्शित झाला असून हा पाहण्यासाठी तुम्हाला 199 रुपये मोजावे लागतील. राम सेतु हिंदी भाषेव्यतिरिक्त तमिळ आणि तेलुगुमध्ये देखील प्रदर्शित होणार आहे.

'राम सेतू' 25 ऑक्टोबर 2022 रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई केलेली नाही. हा चित्रपट तयार करण्यासाठी 150 कोटी खर्च करण्यात आले होते. परंतु या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर केवळ 92 कोटी कमावले आहेत.



## देशभरातील 3000 स्क्रीन्स प्रदर्शित

अभिषेक शर्मा यांच्या दिग्दर्शनात तयार झालेला हा चित्रपट देशभरातील 3000 स्क्रीन्स वर प्रदर्शित झाला होता. 'राम सेतू'मध्ये अक्षय कुमार आणि जॅकलीन फर्नांडिस व्यतिरिक्त अभिनेत्री नुसरत भरुच देखील मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटामध्ये अक्षय कुमाराने एका आर्कियोलॉजिस्टची भूमिका साकारली आहे. जो आपल्या टीमसोबत राम सेतुच्या अस्तित्वाला वाचवण्यासाठी 7 हजार वर्ष जुन्या इतिहासाचा पडदा हटवताना दिसून येतो.

# वनडे मालिकेसाठी मोहम्मद शमीच्या बदली खेळाडूची घोषणा

## रविवारपासून भारत-बांगलादेश संघातील वनडे मालिकेला सुरुवात होणार

**दोहा ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



भारत आणि बांगलादेश संघात तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळली जाणार आहे. या मालिकेला रविवारपासून बांगलादेशमध्ये सुरुवात होणार आहे. परंतु या सामन्यापूर्वी भारतीय संघाला एक मोठा धक्का बसला आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी खांद्याच्या दुखापतीमुळे बांगलादेशविरुद्धच्या संपूर्ण वनडे मालिकेतून बाहेर पडला आहे. बीसीसीआयने याबाबत माहिती दिली आहे. त्याचबरोबर शमीच्या जागी उमरान मलिकचा वनडे मालिकेसाठी बदली खेळाडू म्हणून संघात समावेश करण्यात आला आहे.

बीसीसीआयने सांगितले की, बांगलादेशविरुद्धच्या वनडे मालिकेच्या तयारी दरम्यान सराव सत्रात वेगवान गोलंदाज शमीच्या खांद्याला दुखापत झाली. तो सध्या बेंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाच्या निरीक्षणाखाली आहे. तसेच तो आता तीन सामन्यांच्या वनडे मालिकेला मुकणार आहे. त्यामुळे त्याची जागी उमरान मलिकला संधी देण्यात आली आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० आणि एकदिवसीय मालिकेत उमरान टीम इंडियाचा भाग होता. या दौऱ्यात त्याने शानदार गोलंदाजी केली होती. एकदिवसीय मालिकेत तो टीम इंडियासाठी सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज होता. त्याने तीन सामन्यांत तीन विकेट घेतल्या.

बांगलादेशविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी शमीचाही संघात समावेश करण्यात आला आहे. बुमराहच्या अनुपस्थितीत, शमी एकदिवसीय मालिकेत भारतीय वेगवान आक्रमणाचे नेतृत्व करणार होता. भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला एकदिवसीय सामना रविवारी ढाका येथील शेर-ए-बांगला स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. वनडे मालिकेसाठी टीम इंडिया: रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), शिखर धवन, विराट कोहली, रजत पाटीदार, श्रेयस अय्यर, राहुल त्रिपाठी, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), शाहबाज अहमद, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, मोहम्मद सिराज, दीपक चहर, कुलदीप सेन, उमरान मलिक.

कसोटी मालिकेसाठी टीम इंडिया: रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), केएस भरत (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, शार्दुल ठाकूर, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, उमेश यादव.

# इंग्लंडला बरोबरीत रोखणाऱ्या अमेरिकेचे पॅकअप

## नेदरलँडने गाठली क्वार्टर फायनल

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



नेदरलँडने अमेरिकेचे 3 - 1 असा पराभव करत फिफा वर्ल्डकप 2022 ची क्वार्टर फायनल गाठली. नेदरलँडने पहिल्या हाफमध्ये दोन गोल करत अमेरिकेवर दबाव वाढवला होता. मात्र दुसऱ्या हाफमध्ये अमेरिकेने झुंजार खेळ करत 76 व्या मिनिटाला गोल करत सामना जिवंत ठेवला. मात्र नेदरलँडच्या डमफायर्सने 81 व्या मिनिटाला तिसरा गोल करत अमेरिकेचा पराभव निश्चित केला. विशेष म्हणजे अमेरिकेने साखळी फेरीत संभाव्य विजेत्यांमध्ये गणाल्या जाणाऱ्या इंग्लंडला बरोबरीत रोखले होते. मात्र बाद फेरीत त्यांना आपला खेळ उंचावता आला नाही.

नेदरलँडकडून मेम्फिस डेपे (10), डॅले ब्लिंड्स (45-1) आणि मिडफिल्डर डेनझेल (81) यांनी गोल केले. तर अमेरिकेकडून हाजी राईटने (76) एकमेव गोल केला. बाद फेरीतील पहिला सामना नेदरलँड आणि अमेरिका यांच्यात झाला. पहिल्या हाफपासूनच तुलनेने बलाढ्य असलेल्या नेदरलँडने सामन्यावर आपले नियंत्रण राखण्याचा प्रयत्न केला. सामन्याच्या 10 व्या मिनिटालाच मेम्फिस डेपेने गोल करत नेदरलँडला आघाडी मिळवून दिली. यानंतर अमेरिकेने हा गोल फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र नेदरलँडने पहिल्या हाफमध्ये सामन्याचे नियंत्रण आपल्याकडेच ठेवले. दरम्यान, पहिल्या हाफच्या स्टॉपेज टाईममध्ये पहिल्याच मिनिटाला नेदरलँडच्या डॅले ब्लिंड्सने दुसरा गोल करत अमेरिकेला अजून एक धक्का दिला. ब्लिंड्स हा नेदरलँडकडून वर्ल्डकपमध्ये गोल करणारा दुसरा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला. पहिल्या हाफमध्ये दोन गोल खाल्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये अमेरिकेने नेदरलँडच्या गोलपोस्टवरील आक्रमण वाढवण्यास सुरूवात केली. अमेरिकेला गोल करण्याची संधी देखील मिळाल्या मात्र त्यांचे फटके गोलपोस्टच्या वरून गेले तर नोपर्टने देखील अमेरिकेचे काही प्रयत्न हाणून पाडले. अखेर अमेरिकेला 76 व्या मिनिटाला अमेरिकेने गोल करण्याची संधी दवडली नाही.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही